# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

**P.R.O. Office,Palghar**

phone no 02525-297032,Mo No 8669604078
Address-sp office Bidco Road,Palghar west
E-Mail- propalghar@gmail.com

## प्रेसनोट क्र.५८९ दिनांक १५/०७/२०२०

## स्थानिक गुन्हे शाखा, बोईसर युनिट यांचे पथकाकडुन गावठी हातभट्टी दारु तयार करण्यासाठी लागणारा काळा गुळ व नवसागर असा अवैध्य रित्या साठाकरुन ठेवणा-या आरोपीतावर कारवाई

दिनांक १४/०७/२०२० रोजी १६:०० वाजताचे सुमारास डहाणु पोलीस ठाणे हद्दीतील ऐना गांवचे हद्दीत मुकेश ट्रेडीग या किराणा मालाचे दुकानात, ता. डहाणु, जि.पालघर येथे आरोपीत राजेश मनहरलाल कोठारी वय ४५ वर्षे याने त्याचे मालकीचे किराणा मालाचे दुकानात कर्नाटक व तामीळनाडु राज्यातून गावठी हातभटटीची दारु तयार करण्यासाठी मागविलेला काळा गुळ व नवसागर असा अवैध्य रित्या साठा करून विक्री करण्यासाठी जवळ बाळगला असतांना मिळून आला. आरोपीत याचे ताब्यातुन १) ४,८०,६००/- रुपये किंमतीच्या श्री ब्रम्हानंद सागर जग्गी इंडस्ट्रीज साईट अलगवाडी - हारुगेरी जिल्हा बेळगांव राज्य कर्नाटक असे मार्कीग असलेल्या एकुण ५०० नग सफेद रंगाच्या प्लॅस्टीक गोण्या प्रत्येकी ३० किलो वजनाचा काळा गुळ असलेल्या असे एकूण १५ टन काळा गुळ गावठी हातभटटीची दारु बनविण्याच्या उपयोगात येणारा. २) १,४२,५००/- रुपये किंमतीच्या तामीळनाडु राज्यातून मागविलेला बारदारन्याच्या गोण्यातील काळा गुळ प्रत्येकी ३० किलो वजनाच्या एकुण ५० गोण्या असे एकूण दीड टन वजनाचा काळा गुळ, गावठी हातभटटीची दारु बनविण्याच्या उपयोगात येणारा ३) २८,०००/- रुपये किंमतीच्या एकुण २८ गोण्या नवसागर त्यावर डायमंड एस.सी.एस.एस. असा मार्क असलेल्या गावठी हातभटटीची दारु बनविण्याच्या उपयोगात येणारा असा एकुण ६,५१,१००/- रुपये किंमतीचा मुद्देमालजप्त करण्यात आला असुन आरोपीत याचे विरुध्द डहाणु पोलीस ठाणे गु.र.नं. III १३८/२०२० महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम १९४९ चे कलम ६५ (फ) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई पोलीस निरीक्षक श्री.रविंद्र नाईक, स्थानिक गुन्हे शाखा, पालघर यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा, बोईसर युनिट चे अधिकारी व कर्मचारी यांनी केली आहे.

Scanned with CamScanner




Scanned with CamScanner